# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १.३.२००६ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२६) इतिवृत्त

बुधवार दिनांक ०१ मार्च २००६ रोजे स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०२) श्री. गवळी रविकांत काशीनाथ
(०३) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०४) सौ. लता दलाल
(०५) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०६) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०७) श्री. विसपुते शशांक दामोधर
(०८) श्री. रेणुकादास वैद्य

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य : विद्युत मंडळातर्फे दिवसातून चार तासांचे भारनियमन करण्यात येत आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजचे वेळी विद्युत पुरवठा खंडीत होत असल्याने कामावर विपरीत परिणाम होतो. पर्यायाने कामकाजठप्प होत आहे. उन्हाळ्याचे दिवसात त्याचा त्रास आणखी वाढणार आहे. म्हणून मा.महापौरांसह सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच मा.आयुक्त व नगर सचिव विभागात अखंडीत विज पुरवठ्यासाठी इन्व्हर्टर बसविण्यात यावेत. तशी मागणी लेखी पत्राद्वारे संबंधीत विभागास कळविण्यात आलेली आहे.

मा. सभापती : मा.महापौरांसह सर्व स.पदाधिकारी तसेच मा.आयुक्त कार्यालय व नगर सचिव विभाग तसेच आवश्यकतेनुसार इतर विभागातील विद्युत पुरवठा अखंडीत राहण्याचे दृष्टीने इन्व्हर्टर बसविण्यात यावेत. कार्यकारी अभियंता(ड्रे.,विद्युत,इमा.व उ.बां.) यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

**विषय क्र.२४३ :**

दिनांक १०.१.२००६ (का.प.क्र.२१) व दि. २४.१.२००६ (का.प.क्र.२२) रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक १०.१.२००६ व दि. २४.१.२००६ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.२४४ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहर व सिडको भागातील विविध ठिकाणी सी.आय./डी.आय. जलवाहिनी टाकण्याची कामे सन २००५-२००६ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर झालेली आहेत. सदरहु कामांसाठी लागणारे पाईप व इतर साहित्य कार्यालयाने खरेदी करावे व कंत्राटदारांना पुरवावे असे ठरले आहे. त्यानुसार प्रत्येक कामासाठी लागणारे विविध व्यासाचे सी.आय. व डी.आय. पाईप आणि कामासाठी लागणारे इतर साहित्य व मजूरी अशा प्रकारे (अ व ब) एकत्रीत अंदाजपत्रकास मान्यता घेण्यात आली.

विविध व्यासाच्या डी.आय.के.-९ व डी.आय.के.-७ प्रकारच्या पाईपांचा पुरवठा करणेसाठी वेगळी निविदा (रू.३,५३,९२,३५०/-ची) निविदा सुचना ज.क्र.१०९३/२००५ जी की, राज्य पातळीवरील दैनिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्दीस देण्यात येऊन 'डी' फॉर्म नमुन्यामध्ये निविदापत्रके मागविण्यात आली. त्यामध्ये विविध व्यासाचे व प्रकारचे डी.आय.पाईपांचा पुरवठा करण्यासाठी चार (४) कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विाकरण्याच्या नियोजीत तारखेस एकुण दोन (२) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या, त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.लॅन्को इंडस्ट्रीजलि. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८७% जस्त |
| २. | जिंदाल सॉ लि. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.४% जस्त |

उपरोक्त पुरवठादारांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जस्तीचा दर भरल्याने दर वाटाघाटी करणेसाठी त्यांना बोलविण्यात आले. डी.आय.पाईपांचे सर्वात कमी दर भरणारे मे.लॅन्को इंडस्ट्रीज लि. या कंपनीला दि.२२.२.२००६ रोजे वाटाघाटी करीता बोलाविण्यात आले. दिनांक २२.२.२००६ रोजे अं.प.दरापेक्षा १.५०% जस्ती दरास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे. करीता मे. लॅन्को इंडस्ट्रीज लि. यांची १.५०%अंदाजपत्रकीय दरापेक्षा जस्तची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर व सिडको भागातील विविध ठिकाणी सी.आय./डी.आय. जलवाहिनी टाकण्याचे कामामध्ये आवश्यक असणाऱ्या विविध व्यासाच्या डी.आय.के.-९ व डी.आय.के.-७ प्रकारच्या पाईपांचा पुरवठा करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.लॅन्को इंडस्ट्रीज लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.५०% जस्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री. मुजीब खान :अनेक विकास कामे ही ३० ते ४० टक्के बिलोने ठेकेदार घेत आहे कामाची क्वॉलीटी मिळत नाही. २० टक्के पेक्षा जस्त बिलोने काम देण्यात येवू नये. एकच ठेकेदार जस्तीचे कामे घेत आहे. कोणतेही कामास लवकर सुरूवात करीत नसून केलेले काम व्यवस्थित करीत नाही. अशी परीस्थिती आहे. दोन महिन्यात संपूर्ण शहरातील विकास कामे होणे शक्य नाही. नवीन जे ठेकेदार आहे त्यांना कामे दिली पाहिजे कोणत्या एजन्सीकडे किती व कोठे कामे सुरू आहेत याची यादी संबधीत विभाग प्रमुख यांना देण्याची सूचना केलेल्या होत्या परंतू यादी दिलेली नाही. एकाच ठेकेदारांना १५ ते २० कामे देवून वेळेवर सूरू

केले नाही तर पावसाळयाचे दिवस येतील नंतर काम करता येणार नाही व तीच कामे स्पील ओव्हरमधे जतील या पध्दतीने कार्यवाही होवू नये.

श्री.विनायक पांडे :२० ते २५ टक्के बिलाने जर कुणी काम घेत असेल तर कामाची क्वॉलीटी देणार नाही. जी कामे १० लक्षच्या आतील आहे ती स्थायी समिती समोर येत नाही. अशाही कामाच्या बाबतीत जस्त बिलोने कामे देण्यात येवू नये. त्यांनाही लागू करावे.

मा.सभापती :मागिल बैठकीत सर्व कार्य. अभियंता यांना असे आदेशीत केलेले होते की. ज्या ज्या एजन्सीला देण्यात आलेली कामे व त्यांची किती कामे चालू आहे. अशा एजन्सीची कामाच्या यादीसह माहिती देण्याचे सूचीत केले होते. अदयाप पर्यत माहिती उपलब्ध झालेली नाही. माहिती उपलब्ध असेल तर सभागृहात देण्यात यावी. नंतर लेखी माहिती सर्व सदस्यांना देण्यात यावी. कामे बूक करून योग्य होणार नाही तर ती कामे झाले पाहिजेयास महत्व आहे.

कार्य.अभियंता(पापू.) :सध्या माझ्याकडे माहिती नाही. तीन दिवसात माहिती दिली जईल.

श्री.मुजेब खान :मागिल बैठकीत अधिकारी यांना माहिती देण्याचे सूचित केले होते आजस्थायी समितीची बैठक आहे हे अधिकारी यांना माहिती होते. नेहमीच अशी उत्तरे अधिकारी देत असेल तर योग्य नाही. वार्डात विकास कामे या वर्षी होणार की नाही याचा खूलासा करावा. होणार असेल तर केंव्हा सूरू करणार.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रेनेज):मागिल बैठकीस मी हजर नव्हतो या संबधी मला माहिती नव्हते. या विभागाअंतर्गत जी जी कामे ज्या ज्या एजन्सीला दिलेली आहे त्याची माहिती सर्व सदस्यांना उद्यापर्यंत देण्यात येईल.

मा.सभापती :सर्व कार्य. अभियंता यांना सूचना देण्यात येते की, दोन दिवसात संपूर्ण माहिती स.सदस्यांना देण्यात यावी त्याची एक प्रत सभापती म्हणून माझ्याकडे देण्यात यावी.

श्री.मुजेब खान :माझ्या वार्डात डांबरीकरणाचे कामाचे टेंडर झालेले होते २० ते २५ दिवस झाले अदयाप काम सूरू झालेले नाही. याचा खूलासा घेण्यात यावा.

श्री.शशांक विसपूते : अनेक ठेकेदारांनी जस्तीची कामे घेतलेली आहे. ते काम करण्यास अकार्यक्षम असेल तर काय करता येईल. त्यांनी जस्तीचे काम घेतले ते पूर्ण करू शकणार नाही, या बाबतीत योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती :स. सदस्य श्री. मुजेब खान यांनी त्याचे वार्डातील डांबरीकरणाचे कामास सूरूवात केली नाही अशी सूचना मांडली त्या अनुषंगाने ज्या ज्या कामाचे टेडर झालेले आहे तसेच ज्या ज्या कामाच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत अशी कामे तात्काळ सूरू करण्याची कार्यवाही करण्यात यावी व ज्या ज्या वार्डात जेजेकाम सूरू करण्यात आलेले आहे त्याची माहिती त्या त्या वार्डातील स. सभासद यांना देण्यात यावी. तसेच निविदा काढल्यानंतर पूढील कार्यवाही एक एक महिना लेखा विभागाकडून थांबविली जते हे अत्यंत चूकीचे असून या संबधी यापूढे जे

जे अधिकारी कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांचेवर कार्यवाही प्रस्तावित केली जईल याची नोंद लेखा विभागाने घ्यावी.

प्र.मुख्यलेखाधिकारी :एक महिन्या पासून पुर्वीचे टेंडर संदर्भात कोणतीही संचिका लेखा विभागाकडे प्रलंबीत नाही.

मा.सभापती :रूपये ५.२५ लक्षच्या कामाचे अंदाजपत्रकाची संचिका लेखा विभागाकडे तपासणी करण्यासाठी आलेली होती एक महिना झाला संचिका लेखा विभागात होती. कालच्या दिवसापर्यत त्या संचिकेस एक महिना तीन दिवस झालेले आहे. चूकीची माहिती देवू नये. स.सदस्य श्री. मुजीब खान यांनी जकात पावती बूक संदर्भात मुद्या मांडलेला होता त्या संदर्भात चौकशीचे आदेश केलेले होते मुख्य लेखा परीक्षक यांना अहवाल देण्याचे सुचना केलेल्या होत्या. अहवाल देण्यास किती वेळ लागणार आहे याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.

मुख्य लेखा परीक्षक :२३ तारखेला मा. सभापती याचे सूचना होत्या माझ्याकडे स. सदस्याचे पत्र आलेले आहे. त्यावर त्याची सही नव्हती नेमकी कशाच्या संदर्भात चौकशी करायची आहे याचा उल्लेख होत नाही. उप आयुक्तांना कळविले आहे.

मा.सभापती :सभागृहात जी चर्चा जकात पावती बुक संदर्भात झालेली होती त्याची चौकशी करायची आहे. पावती बूक नंबर देण्यात आलेले आहे.त्याच बाबतीत लेखा परीक्षण करून अहवाल दयायचा आहे तो त्वरीत देण्याची कार्यवाही करावी.

मुख्य लेखापरिक्षक : आठ दिवसात देण्यात येईल.

श्री.मुजीब खान :यापूर्वी मी मा. आयुक्त यांना १० पत्र माझ्या सहिने दिलेले आहे. याचा अर्थ सदस्यांनी दिलेले पत्र अधिकारी हे गायब करीत आहे. पूढील बैठकीत मी दिलेल्या पत्राच्या संपूर्ण प्रति मी सभागृहात सादर करतो त्या सर्व प्रति प्रशासनाकडे असावयास पाहिजे नसता दिलेल्या पत्रास कचऱ्याची टोपली अधिकारी दाखवित आहे असा त्याचा अर्थ होतो.

श्री.रविकान्त गवळी :गारखेडा येथील स.नं.६० पैकी श्री.देशकर भुखंड घोटाळा प्रकरण उघडकीस आलेले होते. तीन सदस्यीय समिती स्थापन केलेली होती. समितीत माझ्यासह दोन अधिकारी होते संबधीत अधिकारी यांना मी लेखी तोंडी बोलून सूध्दा अदयाप पर्यत कार्यवाही केलेली नाही. या सबंधी आतापर्यत काय कार्यवाही केलेली आहे खूलासा घेण्यात यावा.

श्री.रेणूकादास वैद्य :याच प्रमाणे पन्नालाल रस्त्याचे प्रकरण सुध्दा चौकशी करण्यासाठी दिलेले आहे. त्याचाही अहवाल मागविलेला होता .पूढील बैठकीत या दोन्ही प्रकरणाचा अहवाल देण्याचे आदेशीत करावे.

श्री. शशांक विसपूते :संबधीत अधिकारी यांना चौकशी साठी संपूर्ण माहिती प्रशासनाच्या इतर विभागाकडून व्यवस्थतीत पूरविण्यात येते की नाही याचा खूलासा घेण्यात यावा. गारखेडा भूखंड प्रकरणाच्या चौकशीमधे सहकार्य मिळत नाही असे म्हटलेले होते.

मा.सभापती :ज्या ज्या संदर्भात चौकशीचे आदेश दिलेले आहे त्याची चौकशी होत आहे. अंमलबजवणीत प्रगती झालेली दिसत नाही. गारखेडा प्रकरण असेल किंवा पन्नालाल येथील असेल तसेच नोकर भरती संदर्भात असेल तिन्ही चौकशीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेले होते. गारखेडा भूखंड प्रकरणाच्या बाबतीत समितीमधे स. सदस्य श्री. गवळी यांना निमंत्रीत सदस्य म्हणून समावेश केलेला होता. परंतू चौकशी करण्या संदर्भात अधिकारी उपलब्ध होवू शकत नाही, असे मत त्यांनी व्यक्त केलेले आहे. रजेमुळे चौकशी वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पन्नालाल नगरच्या संदर्भात चौकशीच्या बाबतीत सन १९९५ पासूनचे जे भूखंडाच्या बाबतीत प्रकरण असतील त्याची चौकशी करण्याचे मुख्य लेखा परीक्षक यांना आदेशीत केलेले आहे. येणाऱ्या बैठकीत संपूर्ण माहिती देण्यात यावी. गारखेडा भूखंड प्रकरणात शहर अभियता चौकशी साठी आदेशीत केलेले होते. ते आज सभागृहात उपस्थित नाही. त्यांना लेखी पत्र देवून माहिती घेतली जाईल. नोकर भरती संदर्भात कर मुल्यनिर्धारक व संकलन अधिकारी श्री. फड साहेब यांना एक महिन्यात अहवाल देण्याच्या सूचना दिलेल्या होत्या . अहवाल प्राप्त झालेला नाही. चौकशी कूठपर्यत झालेली आहे याचा खूलासा होणे गरजेचे आहे.

कर मु.नि. व संकलक :११२४ नोकर भरती संदर्भात चौकशी होत आहे. उपआयूक्त प्रशासन यांचेकडून माहिती उपलब्ध करून घेत आहेत. १५ दिवसात अहवाल देण्यास लागतील.

मा.सभापती :या चौकशी साठी पूरेसा वेळ संबधीत चौकशी अधिकारी यांना दिलेला होता आणखी कालावधी वाढवून मिळणार नाही. बाकी इतर कामे बाजूला ठेवून नोकर भरती संदर्भातील चौकशी तात्काळ करावी .पूढील बैठकीत अहवाल देण्याची कार्यवाही करावी. निवडणूक, कर आकारणी व मार्च अखेरची कामांची मला जणीव आहे.

श्री.मुजेब खान :माझ्या वार्डातील चंपा मस्जेद येथील डांबरीकरणाचे काम का सुरू करण्यात आलेले नाही.

अति.शहर अभियंता :त्या ठिकाणी दोन वर्षापूर्वी रस्ते विकास महामंडळाकडून काम झालेले आहे.

श्री. मुजेब खान :कामच झालेले नाही केलेले असेल तर त्याची तारीख दयावी.

मा.सभापती :सदर ठिकाणी काम झाले किंवा नाही याची पाहणी उदया सकाळी संबधीत अधिकारी तसेच शहर अभियता संबधीत जेई व स. सदस्य श्री. मुजेब खान यांचे समवेत होईल.अधिकारी यांनी संपूर्ण रेकॉर्ड बरोबर आणावे.

**<u>विषय क्र.२४५ :</u>**

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : विषय क्र २४५ ते २४९ हे लेखा परीक्षण अहवालाच्या संबंधीत विषय आहेत. स. सदस्यांच्या सूचना मी लक्षात घेतलेल्या आहे. यावर निर्णय घेणे संदर्भात माहिती

घ्यावी लागणार आहे. मुख्यलेखाधिकारी श्री. पवार यांचेकडे नुकताच चार्जआलेला आहे त्यामूळे त्यांनीही अभ्यास करण्यास अवधी मागितलेला आहे. या संदर्भात जयकवाडी येथे बैठक घेण्या संबधी स.सदस्यांना कळविण्यात येईल. या बैठकीसाठी सर्व तयारी मुख्यलेखाधिकारी यांनी करावी. ऐनवेळचे सर्व विषयास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे लेखा परिक्षण अहवालावर चर्चा होऊन निर्णय घेण्यासाठी जयकवाडी, पैठण येथे स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यास सर्वानुमते ठरले. त्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र.२४६ :**

सन २०००-२००१ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे लेखा परिक्षण अहवालावर चर्चा होऊन निर्णय घेण्यासाठी जयकवाडी, पैठण येथे स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यास सर्वानुमते ठरले. त्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र.२४७ :**

सन २००१-२००२ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे लेखा परिक्षण अहवालावर चर्चा होऊन निर्णय घेण्यासाठी जयकवाडी, पैठण येथे स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यास सर्वानुमते ठरले. त्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र.२४८ :**

सन २००२-२००३ व २००३-२००४ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे लेखा परिक्षण अहवालावर चर्चा होऊन निर्णय घेण्यासाठी जयकवाडी, पैठण येथे स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यास सर्वानुमते ठरले. त्यास मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र.२४९ :**

सन २००२-०३ ते सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता विभागाचे लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे लेखा परिक्षण अहवालावर चर्चा होऊन निर्णय घेण्यासाठी जयकवाडी, पैठण येथे स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यास सर्वानुमते ठरले. त्यास मंजूरी देण्यात आली.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.२५० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, जयसिंगपुरा चौक ते बिबीका मकबरा पर्यंतच्या रस्त्यासाठी फुटपाथ तयार करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.११,००,४००/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | ०.०१% कमी दराने |
| २ | श्री.पी.एस.जजु | २% जस्त दराने |
| ३ | एस.के.इब्राहीम | ३% जस्त दराने |
| ४ | एस.उएम.शेख | ३.८६% जस्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदराची निविदा मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची असून ती अं.प.दरापेक्षा ०.०१% कमी दराने आहे. मा.आयुक्तांनी वाटाघाटी अंती सदर कामाच्या निविदेस २% कमी दराने करण्याची शिफारस केली आहे. तरी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जयसिंगपुरा चौक ते बिबीका मकबरा पर्यंतच्या रस्त्यासाठी फुटपाथ तयार करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा २% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.५७ जुना मोंढा येथील मुख्य रस्त्याचे व अंतर्गतरस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.२३,४७,०००/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ७ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ४.८०% जस्त दराने |
| २ | श्री.एम.ए.सिद्दीकी | ५.५% जस्त दराने |
| ३ | मे.चारणीया कन्स्ट्रक्शन | ५.७५% जस्त दराने |
| ४ | श्री.डी.अजितसिंग | ६% जस्त दराने |
| ५ | के.बी.पाथ्रीकर | ७% जस्त दराने |
| ६ | रे कन्स्ट्रक्शन | ९% जस्त दराने |
| ७ | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ९% जस्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदराची निविदा मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून ती अं.प.दरापेक्षा ४.८०% जस्त दराने आहे. मा.आयुक्तांनी वाटाघाटी अंती सदर कामाच्या निविदेस अंदाजपत्रकीय दराने करण्याची शिफारस केली आहे. तरी मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.५७ जुना मोंढा येथील मुख्य रस्त्याचे व अंतर्गतरस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, रोशनगेट ते सेंट्रल नाका पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.२२,००,०००/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ५ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.एम.ए.सिद्यीकी | ४.९५% जस्त दराने |
| २ | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ५.५% जस्त दराने |
| ३ | श्री.डी.अजितसिंग | ५.२५% जस्त दराने |
| ४ | मे.चारणीया कन्स्ट्रक्शन | ७.७% जस्त दराने |
| ५ | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ८.८६% जस्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदराची निविदा मे.एम.ए.सिद्यीकी यांची असून ती अं.प.दरापेक्षा ४.९५% जस्त दराने आहे. मा.आयुक्तांनी वाटाघाटी अंती सदर कामाच्या निविदेस अंदाजपत्रकीय दराने करण्याची शिफारस केली आहे. तरी मे.एम.ए.सिद्यीकी यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट ते सेंट्रल नाका पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे.एम.ए.सिद्यीकी यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, जवाहर कॉलनी पोलीस स्टेशन ते गजनन महाराज मंदिर रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.३६,३१,११५/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ४ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | के.बी. पाथ्रीकर | १४.२१% जस्त दराने |
| २ | चंद्राम एन.आशन्ना | १८% जस्त दराने |
| ३ | अरोरा कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही |
| ४ | चारणीया कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.के.बी.पाथ्रीकर यांची असून ती अं.प.दरापेक्षा १४.२१% जस्त दराने आहे. मा.आयुक्तांनी वाटाघाटी अंती सदर कामाच्या निविदेस

अंदाजपत्रकीय दराने करण्याची शिफारस केली आहे. तरी श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहर कॉलनी पोलीस स्टेशन ते गजनन महाराज मंदिर रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.के.बी.पाथ्रीकर यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, वरद गणेश मंदिर ते सावरकर चौक रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.११,६३,१२०/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण २ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.एस.ए.कन्स्ट्रक्शन | ४.९९% जस्त दराने |
| २ | श्री.मोहम्मद सोहेल सिद्यीकी | ५.९०% जस्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदराची निविदा मे.एस.ए.कन्स्ट्रक्शन यांची असून ती अं.प.दरापेक्षा ४.९९% जस्त दराने आहे. या कामाची दोन वर्षापर्यंत संबंधीत एजन्सीने देखभाल करायची असल्याने यासाठी जस्तीचा खर्च येणार असल्याने मा.आयुक्तांनी वाटाघाटी अंती सदर कामाच्या निविदेस २% जस्त दराने करण्याची शिफारस केली आहे. तरी मे.एस.ए.कन्स्ट्रक्शन यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वरद गणेश मंदिर ते सावरकर चौक रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधाकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे.एस.ए.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा २% जस्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, जिल्हाधिकारी कार्यालय ते मजनुहिल मुख्य रस्त्यावरील फुटपाथसाठी पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.१९,२०,६००/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | मे. शहा कन्स्ट्रक्शन | २७.०५% कमी दराने |
| २ | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | २४.५% कमी दराने |
| | मे. अमन असोसिएटस् | २१.८९% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदराची निविदा मे.शहा कन्स्ट्रक्शन यांची असून ती अं.प.दरापेक्षा २७.०५% कमी दराने आहे. तरी मे.शहा कन्स्ट्रक्शन यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालय ते मजनुहिल मुख्य रस्त्यावरील फुटपाथसाठी पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा २७.०५% कमी दराची मे.शहा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, गौतमनगर ते पिसादेवी रस्त्याचे पुन:डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.२२,४३,०००/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ६ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | चारणीया कन्स्ट्रक्शन | ४.९% जस्त दराने |
| २ | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ४.९५% जस्त दराने |
| ३ | मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन | ५.७५% जस्त दराने |
| ४ | श्री.डी.अजितसिंग | ६% जस्त दराने |
| ५ | एम.ए.सिद्यीकी | ७.७८६% जस्त दराने |
| ६ | के.बी.पाथ्रीकर | निविदा उघडली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक चारणीया कन्स्ट्रक्शन यांना दराच्या वाटाघाटीकरीता बोलावण्यात आले असता त्यांनी दर कमी करण्यास नकार दिला. त्यामुळे दुसरे कमी दराचे निविदाधारक मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दराने सदरील काम करण्यास संमती दर्शविली आहे. मा.आयुक्तांनी वाटाघाटी अंती सदर कामाच्या निविदेस अंदाजपत्रकीय दराने करण्याची शिफारस केली आहे. तरी मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गौतमनगर ते पिसादेवी रस्त्याचे पुन:डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी दुसरे कमी दराचे निविदाधारक मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मील कॉर्नर ते ज्युब्ली पार्क रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.१०,३८,१२५/- चे असून या कामाची निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | एस. एम. इब्राहीम | ४.९९% जस्त दराने |
| २ | मो. सोहेल सिद्यीकी | ७% जस्त दराने |
| ३ | जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमीदराची निविदा एस.एम.इब्राहीम यांची असून ती अं.प.दरापेक्षा ४.९९% जस्त दराने आहे. या कामाची दोन वर्षापर्यंत संबंधीत एजन्सीने देखभाल करायची असल्याने

यासाठी जस्तीचा खर्च येणार असल्याने मा.आयुक्तांनी वाटाघाटी अंती सदर कामाच्या निविदेस २% जस्त दराने करण्याची शिफारस केली आहे. तरी मे.एस.एम.इब्राहीम यांची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मील कॉर्नर ते ज्युब्ली पार्क रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम मे.एस.एम.इब्राहीम यांचेकडून अं.प.दरापेक्षा २% जस्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नेहरू बालउद्यान दिल्लीगेट येथे स्वर्गीय राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेसाठी महाराष्ट्र शासनाच्या मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांची मंजुरी असून, त्यासाठी सदरील कामाचे सविस्तर नकाशे उदा.प्लॅन, इलेव्हेशन सेक्शन, आर.सी.सी. डिझाईन इत्यादी पुरविणेसाठी व देखरेखीसाठी पुर्वीच्या महानगरपालिकेच्या पॅनल वरील वास्तुतज्ञ श्री.सांगवीकर यांची नियुक्ती करून त्यांचे मार्फत उपरोक्त नकाशे प्राप्त करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% कन्सल्टन्सी चार्जेसवर नियुक्ती करण्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केली असून प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्याचे आदेशीत केलेले आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरू बालउद्यान दिल्लीगेट येथे स्वर्गीय राजीव गांधी यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणेच्या कामासाठी सदरील कामाचे सविस्तर नकाशे उदा.प्लॅन, इलेव्हेशन सेक्शन, आर.सी.सी. डिझाईन इत्यादी पुरविणेसाठी व देखरेखीसाठी वास्तुतज्ञ श्री.सांगवीकर यांची नियुक्ती करून त्यांचे मार्फत उपरोक्त नकाशे प्राप्त करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% कन्सल्टन्सी चार्जेसवर नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२५९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२८ अंतर्गत असलेल्या मोहल्ला औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील नाल्यास संरक्षीत भिंत बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन २००४-०५ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अं.प.रक्कम रू.१४,८१,६००/- होत आहे.

सदर कमा अर्थसंकल्प २००५-०६ च्या लेखाशिर्ष नाला ट्रेनिंग मधून प्रस्तावित आहे. अर्थसंकल्प पुस्तिका पृष्ठ क्र.१८७ वरील अ.क्र.११ अन्वये या कामास तरतुद उपलब्ध आहे. या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी दि.१७.२.०६ अन्वये शिफारस केली आहे. करीता अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील नाल्यास संरक्षीत भिंत बांधण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.१४,८१,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२६० :**

कार्यकारी अभियंता (जलनि:सारण, विद्युत, इमारती व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका मुख्य इमारती मधील सरदार बी.करमसिंग ओबेरॉय सभागृहाची दुरूस्ती करणे, पार्कींग बोर्ड बसविणे, दरवाजे बसविणे व इतर कामे करण्याबाबतचे अंदाजपत्रक रक्कम रूपये १,९९,६००/- चे सा.बां.खात्याची दरसूची सन २००४-०५ नुसार तयार करण्यात आले आहे. सदर काम तातडीचे असल्याने उपलब्ध ठेकेदार श्री.एस.जी.आढाव यांचे मार्फत काम सुरू करण्यात आले आहे.

तरी वरील प्रमाणे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,९९,६००/- चे काम श्री. एस.जी.आढाव यांच्या नांवे कार्योत्तर मंजुरी तसेच सदर कामास तरतूद उपलब्ध करून देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या स्थायी समिती सभागृह नुतनीकरण करणे व स्थायी समिती सभापती यांचे दालनाची दुरूस्ती करणेचे रक्कम रूपये १,९९,६००/- खर्चाचे काम उपलब्ध ठेकेदार श्री. एस.जी.आढाव यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात येणाऱ्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. सदर कामाकरीता सुधारीत अर्थसंकल्पात प्रशासकीय इमारत टप्पा क्र.१, २,३ या लेखाशिर्षांतर्गत तरतुद करण्यात यावी. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**
**कार्यक्रम पत्रिका क्र. (२६)**

दिनांक : ०१/०३/२००६

**स्थायी समिती सभेसंबंधीची सूचना**

दि.१-३-२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती बैठकीत झालेल्या निर्णयानुसार **'मंगळवार दिनांक ०७ मार्च २००६** रोजी **सकाळी ११.३० वाजता'** जयकवाडी, पैठण येथे स्थायी समिती सभा आयोजित करण्यात आलेली असून या सभेत कार्यक्रम पत्रिका क्र.२६ मधील विषय क्र.१४५ ते १४९ (लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे) विचाराधीन आहेत. करीता या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

टीप:-
जयकवाडी, पैठण येथे जण्याकरीता महापौर निवासस्थान, रेल्वेस्टेशन येथून सकाळी ९.०० वाजता जण्याचे निश्चित झालेले आहे.